Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२ ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

**परीक्षा प्राधान्य/महत्वाचे**

क्र.रा.मं./परीक्षा-२/८०९
पुणे-४११ ००४
दिनांक-२३/०२/२०२४

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
सर्व विभागीय मंडळे.

विषय - माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा मार्च २०२४ चे प्रात्यक्षिक, तोंडी व अंतर्गत (Practical & Internal) मूल्यमापनाचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरणेबाबत.....

संदर्भ - १. या कार्यालयाचे पत्र क्र. रा.मं./परीक्षा-२/५५०८ दि.२६/१२/२०२३
२. या कार्यालयाचे पत्र क्र. रा.मं./गणकयंत्र/१/१७८ दि.१५/०१/२०२४
३. या कार्यालयाचे पत्र क्र. रा.मं./परीक्षा-२/५७२ दि.०९/०२/२०२४

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रे पहावीत. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा मार्च २०२४ चे प्रात्यक्षिक, तोंडी व अंतर्गत (Practical & Internal) मूल्यमापनाचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरणेबाबतच्या सूचना संदर्भिय पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

या संदर्भात सूचित करण्यात येते की, इयत्ता १० वी परीक्षेतील प्रात्यक्षिक, तोंडी व अंतर्गत (Practical & Internal) मूल्यमापनाचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरण्यासाठी शनिवार दिनांक ०९/०३/२०२४ पर्यंत कालावधी देण्यात येत आहे. या कालावधीत सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांनी ऑनलाईन पध्दतीने गुण नोंदवून मंडळाकडे ऑनलाईन पाठवावयाचे आहेत.

तसेच संदर्भीय पत्र क्र. २ सोबत जोडलेल्या कार्यपध्दतीमधील सूचना क्र. ८ नुसार माध्यमिक शाळांनी खालील प्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

आपल्या माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांकानिहाय ऑनलाईन पध्दतीने नोंदविलेल्या गुणांची Final Printout घेऊन त्यावर अंतर्गत व बहिस्थ परीक्षकांची स्वाक्षरी (आवश्यक त्या विषयाच्या बाबत) व तोंडी, अंतर्गत मूल्यमापन, श्रेणी इत्यादी गुणतक्त्यानुसार संबंधित विषय शिक्षकांची स्वाक्षरी घेऊन सदर गुणतक्त्यावर मुख्याध्यापक यांनी माध्यमिक शाळेचा शिक्का उमटवून स्वाक्षरी करावयाची आहे व सदरचे गुणतक्ते प्रचलित पध्दतीप्रमाणे सिलबंद पाकिटामध्ये, पाकिटावर माध्यमिक शाळेचे नाव, Index No. घालून बुधवार दिनांक १३/०३/२०२४ पर्यंत विभागीय मंडळाकडे जमा करावयाचे आहेत. तसेच गुणतक्त्याची एक प्रत शाळेने माहितीस्तव जतन करणे आवश्यक आहे.

सदर बाब आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व माध्यमिक शाळांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

(अनुराधा ओक)
सचिव
राज्य मंडळ, पुणे ०४.

प्रत माहितीस्तव-व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ, पुणे.

क्र.नाविमं/माध्य.ब-१/ 4182
नाशिक ४२२००३
दि.२४/०२/२०२४ 27

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त शाळा,
नाशिक/धुळे/जळगाव/नंदुरबार

उपरोक्त राज्यमंडळाच्या पत्रानुसार कळविण्यात येते कि, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा मार्च २०२४ चे प्रात्यक्षिक, तोंडी व अंतर्गत (Practical Internal) मूल्यमापनाचे ऑनलाईन पद्धतीने गुण भरणेकरिता <u>दिनांक ०९/०३/२०२४</u> पर्यंत कालावधी देण्यात येत आहे. तसेच सदर पत्रात नमूद केल्याप्रमाणे सदर साहित्य <u>बुधवार दिनांक १३/०३/२०२४</u> रोजी मंडळाच्या नियमित वितरण केंद्रावर स्वीकारण्यात येणार आहे, याची नोंद घ्यावी.

(मोहन देसले)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक ४२२००३

SSC B1